# संशोधक

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

● वर्ष : ९० ● मार्च २०२२ ● पुरवणी मराठी विशेषांक ०७





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

Scanned with CamScanner

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ७

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक :

● डॉ. प्रमोद एस. मेश्राम ● डॉ.बळवंत टी. दाभाडे ● श्री.मनोहर आर. कोंडागुर्ले

✲ प्रकाशक ✲

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

१ स्वतंत्रता के बाद बौद्धो कें जीवन में सामाजिक परिवर्तन
- डॉ.प्रमोद मेश्राम, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------------------- १०

२ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्य प्रवाहाची वाटचाल
- डॉ. विकास पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------------------- १५

३ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक
- डॉ.बळवंत दाभाडे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------------------- २१

४ स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) – डॉ.सुधीर वाघमारे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी --------- २६

५ स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळीचा विकास
- डॉ.अशोक पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------------------- ३१

६ भारतीय स्वातंत्र्योत्तरकालीन ग्रंथालयातील नवे प्रवाह: एक अभ्यास
- डॉ.जयंत मेश्राम, रिसोड, जि.वाशिम ---------------------- ३६

७ स्वांतत्र्योत्तर काळातील वाढते शहरीकरण
- डॉ. प्रतिभा देसाई, गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर ---------------------- ३८

८ स्वातंत्र्योत्तर कालखंडात सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास
- डॉ. शशिकांत वानखडे, आर्णी, जि.यवतमाळ ---------------------- ४२

९ स्वातंत्र्योत्तर हिंदी पत्रकारिता
- डॉ.संतोष रायबोले, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग ---------------------- ४७

१० स्वातंत्र्यप्राप्ती आणि सुरेश भट
- डॉ. चैनलाल राणे, गोरेगाव, जि.गोंदिया ---------------------- ५१

११ डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्राच्या पाचव्या सिद्धांतानुसार महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथसंख्येत झालेली वाढ : एक अभ्यास
- अंबादास खिलारे, डॉ.दिलीप मेस्त्री, पनवेल, नवी मुंबई ---------------------- ५५

१२ मानवी हक्क व दलित कविता
- डॉ. नरेंद्र घरत, डॉ.कविता लुटे, नागपूर ---------------------- ५८

१३ स्वातंत्रोत्तर भारतीय शिक्षण व्यवस्थेवर महात्मा गांधींचा प्रभाव
- डॉ.नंदकिशोर मने, गडचिरोली ---------------------- ६४

१४ भारतीय ग्रंथालय कायदे : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ चे सार्वजनिक ग्रंथालय विकासात महत्त्व – अनंत थोरात, रोहा, जि.रायगड ---------------------- ६८

१५ स्वातंत्रोत्तर काल मे महिला सशक्तिकरण एवं शिक्षा का महत्त्व
- डॉ.रजनी वाढई, गडचिरोली ---------------------- ७५

१६ स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत दैनिक संचार'चे संपादक रंगा वैद्य यांचे योगदान
- शंकर पवार, कोल्हापूर ---------------------- ७९

१७ स्वातंत्रोत्तर भारतातील आदिवासींची स्थिती, संविधानिक तरतुदी व कायदे
- डॉ.नरेश मडावी, गडचिरोली. ---------------------- ८४



Scanned with CamScanner

१८ स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये गीताचार्य तुकारामदादा यांचे सामाजिक कार्य : एक ऐतिहासिक अध्ययन
- प्रीती ठिकरे, नंदकिशोर मने, गडचिरोली ---------------------------- ८८

१९ आधुनिक भारतात आदिवासी महिलांचे स्थान
- डॉ.प्रमोदकुमार नंदेश्वर, रिसोड, जि.वाशिम ------------------------ ९२

२० स्वातंत्र्योत्तर काळातील दलित आत्मकथने : समाजपरिवर्तनाचा एक दस्तऐवज
- डॉ.सतीश कामत, फोंडाघाट, सिंधुदुर्ग. ----------------------------- ९७

२१ स्वातंत्र्योत्तर काळातील नागरी इतिहासाची मांडणी आणि पुनर्मांडणी : विशेष संदर्भ पूर्व मध्यकालीन महाराष्ट्र - प्रा. लखन गौडदाब, कराड, जि.सातारा ------------------------ १०१

२२ स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय साहित्य
- डॉ.उज्ज्वला सामंत, मालवण, सिंधुदुर्ग --------------------------- १०७

२३ विसाव्या शतकातील पर्यावरण व स्त्रियांच्या चळवळी
- प्रा. अभय पाटील, कराड, जि.सातारा. ------------------------ ११२

२४ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय शिक्षणाच्या विकासाची प्रक्रिया
- डॉ.निलिमा मिरजकर, गोरेगाव, रायगड --------------------------- ११७

२५ शरद जोशी – भारतीय शेतकरी आंदोलनाला दिशा देणारा नेता
- पंकज घाटे, प्रा.डॉ.स्वप्ना समेळ, मुंबई ---------------------------- १२१

२६ भारताचे परराष्ट्र धोरण आणि २०१४ नंतरचे बदलते संदर्भ
- डॉ. प्रशांत सराफ, परभणी ------------------------------------ १२६

२७ स्वतंत्रता प्राप्ति के पश्चात महिला सक्षमीकरण के बदलते स्वरूप
- अमिता कुमारी, वाराणसी ------------------------------------ १३०

२८ स्वातंत्र्योत्तर काळ आणि स्त्रिवाद
- डॉ.रवि साखरे, गोरेगाव, गोंदिया --------------------------------- १३४

२९ आधुनिक भारतातील भूगोल विषयाच्या बदलत्या स्वरूपाचे विश्लेषणात्मक अध्ययन
- डॉ.कल्पना देशमुख, यवतमाळ. ---------------------------------- १३९

३० भारतीय हवामान बदलाचे – कारणे व उपाय
- डॉ. राजेश कांबळे, ब्रह्मपुरी, जि.चंद्रपूर ---------------------------- १४२

३१ स्वातंत्र्योतर भारतातील कामगार विषयक धोरण
- डॉ.बी.आय.परदेशी, शिरपूर, जि.धुळे ------------------------------ १४५

३२ स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शिक्षण
- श्री.दिपक यादव, चिपळूण, जि.रत्नागिरी. ---------------------------- १४७

३३ स्वातंत्र्योत्तर काळातील प्रसारमाध्यमांचे पर्यटन विकासातील योगदान
- डॉ.हिरालाल पाटील, शहादा, जि.नंदुरबार ----------------------------- १५२

३४ मान्यवर कांशीराम यांच्या विशेष संदर्भात स्वातंत्र्योत्तर काळातील दलित-बहुजन चळवळ
- डॉ.प्रविण बोरकर, उल्हासनगर, जि.ठाणे ----------------------------- १५६

३५ स्वातंत्रोत्तर भारतातील महिलांचे राजकीय सक्षमीकरण
- डॉ.लोकेशकुमार नंदेश्वर, ब्रह्मपुरी, चंद्रपूर ---------------------------- १६१



Scanned with CamScanner

३६ **भारतीय स्वातंत्र्यानंतरची दलितांची राजकीय वाटचाल आणि स्थिती**
- डॉ.जनार्दन जाधव, गगनबावडा, जि.कोल्हापूर ---------- १६६

३७ **बीसवीं सदी के अंतिम दशक के हिंदी के सामाजिक नाटकों में महानगरीय जीवन बोध : अकेलेपन के संदर्भ में** - डॉ.राहुल मराठे, लांजा. जि.रत्नागिरी ---------- १७०

३८ **चंद्रपूर जिल्ह्यातील आंबेडकरोत्तर चळवळीत समता सैनिक दलाचे योगदान**
- डॉ. प्रफुल राजुरवाडे, चिमूर, जि.चंद्रपूर. ---------- १७४

३९ **चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी महिलांच्या विकासात स्वंयसहाय्यता बचत गटाचे योगदान**
- प्रा.पितांबर पिसे, डॉ. संजय कुंभारे, जि.चंद्रपूर ---------- १७७

४० **स्वातंत्र्योत्तर काळातील सोलापूर जिल्ह्याचे पर्यटन विषयक धोरण : एक चिकित्सक आढावा**
- डॉ.रविराज कांबळे, पंढरपूर, जि.सोलापूर ---------- १८१

४१ **महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप**
- बाळू गायकवाड, मोहोळ, जि.सोलापूर ---------- १८६

४२ **स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातून दिसणारे महिला सक्षमीकरण**
- डॉ.सारिका बुरगे, केज, जि.बीड ---------- १८८

४३ **स्वातंत्र्यानंतरचे भारतीय जीवन: कवितेतून व्यक्त झालेले चिंतन**
- डॉ.महेश बावधनकर, लांजा, जि.रत्नागिरी ---------- १९२

४४ **भारतीय स्वांतत्र्योत्तर काळातील ग्रंथालये**
- राजू बोंबले, डॉ.शोभा सुळसुळे, जि.परभणी ---------- १९८

४५ **भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्रांतिकारकांनी दिलेले योगदान व स्वातंत्र्य लढे** - गजानन होडे, डॉ.रामभाऊ मुटकुळे, नाशिक ---------- २०२

४६ **स्वातंत्रोत्तर भारताचे शैक्षणिक धोरण : एक आढावा**
- डॉ.रूपेश मेश्राम, ब्रह्मपुरी, चंद्रपूर ---------- २०८

४७ **कोकणातील पर्यटन विकास प्रक्रीयेतील समस्यांचा अभ्यास**
- डॉ.देविदास हारगिले, मालवण, सिंधुदुर्ग ---------- २१४

४८ **महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप**
- प्रा.हेमश्री चिटणीस, देवगड, जि.सिंधुदुर्ग ---------- २१८

४९ **भारतीय स्वातंत्र्यानंतरचे बदलते शैक्षणिक धोरण**
- प्रियंका कुंभार, कोंडवे, सातारा, ---------- २२३

५० **स्वातंत्र्योत्तर भारतामधील कुस्ती क्षेत्रात कोल्हापूरने मिळविलेला नावलौकिक एक अभ्यास**
- डॉ.संभाजी मोरे, तिसंगी. ---------- २२८

५१ **भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या आर्थिक धोरणांचा संक्षिप्त मागोवा**
- डॉ.श्रीकांत चांदोरकर, गोरेगाव, रायगड ---------- २३२

५२ **मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संस्थेच्या प्रगतीतील डॉ.वसंतराव पवार यांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास** - अमित निकम, डॉ.रमेश जाधव, जि.नाशिक ---------- २३६

५३ **माहिती तंत्रज्ञानाचे बदलते स्वरुप** - डॉ.सीता केंद्रे, केज, जि.बीड ---------- २४१

५४ **स्वातंत्र्योत्तर भारताच्या सामाजिक चळवळी मध्ये बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे योगदान**
- श्री.जयंतकुमार रामटेके, डॉ.रूपेश मेश्राम, जि.चंद्रपूर ---------- २४४




Scanned with CamScanner

 ISSN No. 2394-5990


५५ **महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरुप** – प्रा.उमा पाटील, पन्हाळा, जि.कोल्हापूर --------- २४९

५६ **भारतीय शेती उद्योगाचे आधुनिकीकरण** – प्रा.नागोराव तारू, खालापूर, जि.रायगड -------- २५३

५७ **महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरुप** – डॉ.मनिषा नागपुरे, नागपूर ----------------- २५७

५८ **भारतीय स्वातंत्र्यानंतरचे बदलते शैक्षणिक धोरण** – प्रा.कविता मांजे, कल्याण, ठाणे ------- २६१

५९ **महिलांचा उद्योजकतेमधील वाढता सहभाग व महिला सबलीकरण** – प्रा.चंद्रप्रभा, नाशिक ---- २६६

६० **भारताची कायदा व्यवस्था** – डॉ.अरविंद पुनवटकर, सावनेर, नागपूर ---------------- २७१

६१ **स्वातंत्र्योत्तर आंदोलनों के विविध परिदृश्य** – डॉ.दत्तात्रय अनारसे, माढा, सोलापूर -------- २७४

६२ **पंडित नेहरूंच्या काळातील आर्थिक विकासाचे चिकित्सक मूल्यमापन**
– प्रा.विजय साळुंके, अमळनेर, जि.जळगाव. ---------------------------- २७७

६३ **इचलकरंजीची यंत्रमाग कामगार व्यवस्था आणि बदलते स्वरूप**
– श्री.कुबेर शेकाप्पा कट्टीमनी, इचलकरंजी, जि.सांगली ---------------------- २८०

६४ **भारताचे अलिप्ततावादी धोरण आणि अमेरिका सहसंबंधाचा आढावा (इ.स. १९४७ ते इ.स.२०००)**
– डॉ.डी.बी ताडेराव, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग ------------------------- २८४

६५ **अ. ब. वालावलकर यांचे इतिहास संशोधनविषयक कार्य–**
– डॉ.सोमनाथ कदम, कणकवली, सिंधुदुर्ग. -------------------------- २८९

६६ **स्वातंत्र्योत्तर भारतीय परराष्ट्रीय धोरण** – डॉ.संजय बेंद्रे, म्हसळा, जि.रायगड ----------- २९२

६७ **माहितीची गरज आणि सोशल मिडिया** – सौ.स्मीता पाटोळे, सातारा; डॉ.सुधीर पाटील, जळगाव २९५

६८ **हवामान बदलाचा लांजा तालुक्यातील शेतीवर झालेला परिणाम**
– डॉ.काशिनाथ चव्हाण, लांजा, जि.रत्नागिरी. ------------------------ ३००

६९ **भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रंथालय चळवळ** – डॉ.अनिता पाटील, बडनेरा --------- ३०५

७० **'गोडसे गांधी.कॉम – नाटक की रंगमंचीयता'** – विजय देवकर, राजापूर, रत्नागिरी -------- ३११

७१ **स्त्री सक्षमीकरणासाठी शिक्षण** – डॉ.संगीता पैकेकरी, माढा, जि.सोलापूर. ------------ ३१५

७२ **हिंदी उपन्यासों में चित्रित आदिवासी जीवन संघर्ष** – हिरामण पवार, राजापूर, जि.रत्नागिरी --- ३१९

७३ **सातारा जिल्ह्यातील शतकोत्तर ग्रंथालयाचा इतिहास** – सौ.आशा जिरगे, सातारा. --------- ३२५

७४ **महाराष्ट्र शासनाच्या जलसिंचन अधिनियमांचा चिकित्सक अभ्यास**
– कु. वनिता पाटील, कबनूर, कोल्हापूर ---------------------------- ३३०

७५ **स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित चळवळीतील क्रांतीनायक बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे : एक ऐतिहासिक अध्ययन** – डॉ.पंकज मून, वडनेर, ता.हिंगणघाट, जि.वर्धा --------------- ३३५

७६ **भारतीय स्वातंत्र्यानंतरची राजकीय व साहित्यिक स्थिती** – डॉ.नामदेव शिंदे, माढा, जि.सोलापूर – ३४०

७७ **महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप** – डॉ.शर्मिला घाटगे, कोल्हापूर. -------------- ३४३

७८ **माहिती तंत्रज्ञानाचे मानवी समाजावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन**
– प्रा. रेखा वाठ, कळंब, जि.यवतमाळ ---------------------------- ३४७

७९ **स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार व कार्य**
– प्रा.सुमन केंद्रे, पंढरपूर, जि.कोल्हापूर, --------------------------- ३५३

८० **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कालखंडातील दलित चळवळीचा अभ्यास**
– डॉ.अनिल टिके, फलटण, जि.सातारा. ----------------------------- ३५७




Scanned with CamScanner

८१ आधुनिक ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक संबंध आणि वतनदारी व्यवस्था
– डॉ.संतोष सुरडकर, गडचिरोली ------------------------------ ३६२

८२ रानडेंचा सुधारणावाद आणि भक्ती चळवळीविषयीचे चिंतन
– डॉ.संतोष सुरडकर, गडचिरोली ------------------------------ ३६७

८३ Educational & Social Reforms In India During British Period
– Dr.Sudhakar Lahupachang, Kalamboli, New Mumbai -------------- ३७१

८४ Revisiting Quit India Movement: A Case Study on Northeastern region of Maharashtra – Dr. Prakash Masram, Mumbai -------------------- ३७४

८५ Study of Post-Independence Indian Libraries: A Special Reference to Academic Libraries -Manohar Kondagurle, Dr.Rashid Khatik -------------------- ३७९

८६ Collection Development Practices for e-Resources: A Survey of Academic Law Libraries affiliated to Savitribai Phule Pune University Pune
- Madhukar Togam, Dr.Deelip Mestri, Panvel, Navi Mumbai ----------- ३८४

८७ The Role of Translation in Post-Independence Era: English Translations of Dalit Literature in India –Dr. Dharampal Fulzele, Brahmapuri, Chandrapur ------ ३९०

८८ Folklore's Editor Sankar Sen Gupta's Three Decade Devotion to Bring Cultural Enhancement after Independence
– Dr.Neeta Khandpekar, Kalina, Santakruz, Mumbai ------------------ ३९६

८९ Changing Educational Policy after Indian Independence
– Prof. Shital Barge, Rajapur, Ratnagiri. ------------------------ ४०४

९० POST-INDEPENDENCE TOURISM POLICY: GEOGRAPHICAL ANALYSIS
–Dr. Rajaram Patil, Phondaghat, Dist.Sindhudurg. -------------------- ४०७

९१ Nation, Nationalism, Minorities in M. J. Akbar's Blood Brothers
- Ashutosh Popate, Chimur, Chandrapur ------------------------ ४११

९२ A study on Irrigation Development for agriculture Development in Kolhapur District (Maharashtra) – Mr.Sohel Mujawar, Dr.S.M.Bhosale, Kolhapur -------- ४१५

९३ Reflection of 21st century woman: A Critical Analysis of Baby Halder's "Life Less Ordinary" – Rashmi Purke, Uran, Navi Mumbai -------------------- ४२३

९४ Industrial Policy of Maharashtra 2019: A Study
– Saddamso Pirjade, Sarud, Kolhapur ४ -------------------------- ४२७

९५ Depiction of Sociocultural Realities in the Novels of J. M. Coetzee
– Mr.Anup Atram, Dr.Sandeep Joshi, Morshi, Amravati --------------- ४३२

९६ Cyber Security and Cyber Crime Awareness Need of Time: A Critical Analysis
- Nandini Gaikwad, Pooja Thakur, Nitin Sasane, Ravindra Morbeka, Sanjay Gaikwad, Panvel, Navi Mumbai ---------------------- ४३६

९७ Women's Economic Empowerment in India After Independence
– Neha Singh, Dr.Vishnu Fulzele, Ulhasnagar, Thane ----------------- ४४१

९८ District Central Co-operative Bank : An Overview
– Prof. Rupali Dikonda, Mhada, Solapur ----------------------------- ४४५

९९ Revisiting India's Policy towards her Diaspora Since Independence
–Dr. Karmveer Singh, Jaipur ------------------------------------ ४५०



Scanned with CamScanner

१०० Changing Nature Of Tribal Literature During Post-independence Era
- Vaibhav Masram, Gadchiroli ---------------------------------- ४५५

१०१ Study of Inconvenience Analysis of Fisher women in Ratnagiri District
- Dr. Ghansham Harale, Rajapur, Dist.Ratnagiri -------------------- ४५१

१०२ Role of Bio-Chemical Inputs in Agricultural Development of Kolhapur
District of Maharashtra - Jayvant Palkar, Madha, Dist.Solapur ---------- ४६५

१०३ The Role Of Women Empowerment Changing Scenerios In India
- Mr. Jayawant Pawar, Wai, Dist. Satara ------------------------- ४६१

१०४ An Overview of analysis of Wooden Toys Industry of Sawantwadi (Sindhudurg
Dist.) - Dr. Ghansham Harale, Rajapur, Dist.Ratnagiri --------------- ४७४

♦♦♦



Scanned with CamScanner

# मानवी हक्क व दलित कविता

डॉ. नरेंद्र घरत १
डॉ. कविता लुटे २
सहायक प्राध्यापक,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, उमरेड रोड, नागपूर ४४००२४
मोबाईल नं.९८८१९२०६२८, ९५०३७८४६६२
Email - gharatnarendra78gmail.com, kavitalute1985gmail.com

**सारांश :**

मानवी हक्क ही संकल्पना प्रत्येक व्यक्तीच्या सुखाशी, समाधानाशी निगडित आहे. मनुष्याला त्याचे जीवन सुकर करण्याकरीता मानवी हक्काची कास धरावी लागते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मानवी हक्काच्या सूत्राचा अवलंबनाने मनुष्याचा सर्वांगीण विकास साधला जातो. मानवी अस्तित्व अबाधित राखण्याकरिता मानवी हक्काचे जतन होणे अत्यंत आवश्यक आहे . म्हणूनच आजच्या सद्यपरिस्थितीत मानवी हक्काला मनुष्याच्या जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे हे या लेखाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

**बीज शब्द :** मानवी हक्क, दलित कविता, दलित साहित्य, मराठी साहित्य.

**प्रस्तावना :**

मानवी हक्काची ही संकल्पना साहित्यक्षेत्रातूनही विशेषत्वाने व्यक्त होताना दिसून येते. विश्वमांगल्याची भावना, मानवतेची शिकवण, न्यायाची, बंधुत्वाची संकल्पना आदि गोष्टींचे संदर्भ साहित्य कृती अभिव्यक्त करीत असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शूद्रातिशूद्रांना वर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध उभारलेले उत्थानाचे लढे ही प्रमुख प्रेरणा दलित साहित्याच्या मागे आहे. डॉ. बाबासाहेबांनी भारत देशाला दिलेल्या राज्य घटनेतून, मूल्य व्यवस्थेतून एक नवी विचार परंपरा उदयास आली. ही परंपरा मानवी मूल्यांचा स्वीकार करणारी आहे . शोषित, पिडितांना प्राप्त झालेल्या भानातून सुशिक्षितांनी घेतलेला आत्मशोध दलित साहित्यातून अर्थातच सर्वच साहित्य प्रकारातून व्यक्त झालेला आहे. दलित कविता वेदना ,विद्रोह व नकाराचे रूप घेत अवतरत असली तरी मानवतेची शिकवण, विज्ञाननिष्ठा, समताधिष्ठित समाज यांना केंद्रस्थानी ठेवून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी हक्काच्या मूल्यांना स्थान प्राप्त करून देणारी ठरते. या सर्वच दृष्टीने दलित कविता दलित बांधवांच्या ठायी आत्मसन्मान, आत्मविश्वास व स्वावलंबन निर्माण करीत आकारास आली आहे. बदलत्या समाजजीवन मूल्यांचा स्वीकार करीत मानवी मूल्यांचे जीवन संदर्भ दलित कविता व्यक्त करते. या दृष्टीने केशव मेश्राम, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, दया पवार, नामदेव ढसाळ, किसन फागू, ज्योती लांजेवार, त्र्यंबक सपकाळे यांच्या सारख्या कितीतरी कवी कवयित्रींची कविता उल्लेखनीय अशी ठरलेली आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्ट्ये –**

* व्यक्तीच्या विकासाकरिता मानवी हक्काची संकल्पना रुजणे महत्त्वपूर्ण आहे, हे स्पष्ट करणे .
* दलित साहित्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीचा, कृतीचा परिणाम स्पष्ट करणे.
* दलित कविता वेदना, विद्रोह, नकार यासोबतच मानवी हक्काचे मूल्य जोपासत आहे हे निदर्शनास आणणे.
* दलित कविता स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या मूल्यांचा स्वीकार करीत मानवी हक्क संकल्पना रुजवते हे स्पष्ट करणे.

**संशोधनाचे महत्त्व –**

दलित कविता दुःख, वेदना, विद्रोहाचे रूप घेत जरी कायम आकारास आली असली तरी बदलत्या जीवनमूल्यांचे संदर्भ देखील तितक्याच समर्थपणे टिपते. मानवी हक्काची जाणीव दलित कवितेतून निर्माण झाली असून त्याद्वारे समताधिष्ठीत समाजव्यवस्था निर्माण व्हावी हे संदर्भमूल्य दलित कविता व्यक्त करते. मानवता, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा स्वीकार करीत दलित कवी कवयित्रींनी आपल्या भावनानुभवाला उत्कट पातळीवर व्यक्त केले आहे. याची प्रचीती या संशोधन लेखाचे महत्त्व आहे.

**मानवी हक्क व दलित कविता :**

प्रत्येक व्यक्तीस जीवन जगण्याचा निसर्गसिद्ध हक्क आहे मग ती व्यक्ती कोणत्याही जातीची, धर्माची, प्रांतांची किंवा राष्ट्राची असो. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या इच्छेप्रमाणे जीवन जगण्याचा हक्क अधिकार असतो. हे निसर्गदत्त हक्क



Scanned with CamScanner

सबंध मानवजातीला प्राप्त झाले पाहिजे या हेतूने 'मानवी हक्क' ही संकल्पना आजच्या काळात उदयास आलेली आहे. आजच्या सद्यस्थितीत मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले आहे. मानव म्हणून नैसर्गिक नियमानुसार काही अधिकार मनुष्यास मिळाले असतात. त्यास मानवी हक्क ही संकल्पना वापरली जाते. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला मनुष्य या नात्याने काही हक्क नैसर्गिकरीत्या प्राप्त झालेले असतात . मानवाधिकाराची संकल्पनाच मुळात मानवाच्या सुखाशी निगडित आहे. प्रत्येक माणूस स्वतःच्या सुखासाठी धडपडतो. माणसाच्या स्वभावाची तशीच घडण आहे तो दुसरे काही करू शकत नाही म्हणूनच मानवी हक्काची संकल्पना सध्याच्या परिरिथितीत माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून देते. मानवामध्ये मानवता निर्माण करते. त्याच्या स्वाभिमानाला साजेल अशा हक्क आणि कर्तव्ये याची जोड लावून देते.[१] मनुष्य हा समाजशील प्राणी आहे . सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून व्यक्ती समाजशील बनत असतो. व्यक्तीला सामाजिक जीवन जगताना समाज स्वैर, स्वच्छंदीपणे जीवन जगण्याची मुभा मनुष्यास देत नाही. सामाजिक जीवन जगत असताना त्याला समाजाच्या काही अटी आणि नियमांचे पालन करावे लागते. सामाजिक जीवनात व्यक्तीला प्राप्त झालेल्या अशा संधी किंवा सवलती म्हणजे हक्क होय या संदर्भात विविध अभ्यासकांनी व्याख्या केलेल्या आहेत. प्रा. एच. जे. लास्की च्या मते, 'हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की ज्या व्यक्तीला सामान्यतः स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.' तर रिचर्ड बॅसरस्ट्रॉम यांच्या मते, 'व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याकरता आवश्यक क्षमतांचा विकास करण्यासाठी प्राप्त आवश्यक अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.'[२]

यावरून एक गोष्ट विशेषत्वाने लक्षात येते की, मानवाधिकार व्यक्तीला माणूस म्हणून जन्माने प्राप्त झालेले असतात आणि हे अधिकार व्यक्तीला सन्मानपूर्वक जीवन जगण्याकरता व व्यक्तिमत्त्वाच्या विकासाकरिता अपरिहार्य ठरतात. मानवाधिकाराचा संबंध हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी निगडित असा आहे म्हणूनच भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येकच भारतीयाला सुकर जीवन जगता यावे या अनुषंगाने भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला विविध हक्क, अधिकार बहाल केले आहेत. प्रत्येकच व्यक्ती जन्मतः स्वतंत्र असून वंश, वर्ण भाषा धर्म यांचा विचार न करता प्रत्येकच देशाने मानवाधिकाराचा स्वीकार केला आहे. त्यात प्रामुख्याने मानवी हक्काच्या चार सूत्रांचा विशेषत्वाने समावेश होतो

**स्वातंत्र्य** - प्रत्येक व्यक्तीस जीवन आपल्या स्वेच्छेप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य आहे . स्वातंत्र्य हे प्रत्येकाचे मुलभूत हक्क आहे. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकारांमध्ये या अधिकाराचा समावेश होतो. कोणत्याही व्यक्तीचे जीवन किंवा त्याचे व्यक्तिगत स्वातंत्र्य हिरावून घेता येत नाही. जीवन जगण्याच्या अधिकारांमध्ये केवळ जीवन जगणेच अभिप्रेत नाही तर प्रत्येकाने सन्मानपूर्वक जीवन जगणे अभिप्रेत आहे. समाजात मग तो कुठल्याही जाती, धर्म, वंशाचा असो त्यास सर्व संधी, अधिकार, हक्क मिळाले पाहिजे असे स्वातंत्र्याच्या हक्कात समाविष्ट आहे.

**समता** – समाजातील सर्व माणसे जन्मतः समान असून कोणत्याही आधारावर त्यांच्यात भेदभाव करता कामा नये हा विचार समानतेच्या अधिकारात समाविष्ट आहे तसेच कायद्यापुढे प्रत्येक व्यक्ती समान असून कायद्यांतर्गत समाजातील सर्वच घटकांना समान संरक्षण आहे.

**न्याय** – समाजात शांतता, न्याय प्रस्थापित व्हावे या अनुसरून याबाबतची तरतूद केलेली आहे . सर्व नागरिक न्यायसंस्थेसमोर समान असून हे तत्त्व या अंतर्गत स्वीकारले गेले आहे. मुलभूत हक्काचे जतन, शोषणाविरुद्ध तरतुदी, अनुसूचित जाती जमाती आर्थिक व शैक्षणिक हितसंबंधांना प्रोत्साहन, अस्पृश्यता बंदी अशा माध्यमातून न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो .

**बंधुता** – समाजातील प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा राखत राष्ट्राची एकता अबाधित राहणे बंधुता या तत्त्वात अभिप्रेत आहे. भारतात विविधतेत एकता प्रस्थापित करण्याकरीता बंधुता या तत्त्वास विशेष प्राधान्य दिलेले आहे.

एकंदरीत मानवी हक्क शाश्वत मानवी जीवनासाठी आणि व्यक्ती विकासासाठी अत्यावश्यक असल्याने त्याचे महत्त्व अनन्य असेच अनन्यसाधारण असे आहे. व्यक्ती जन्माला येते तेव्हा कुटुंबातील अन्य व्यक्तीशी ती बांधली जाते व्यक्तीचे समाजाशी असलेले नाते हे कुटुंबातील सदस्य, मित्र गटातील सभासद आणि समाजाचा एक घटक असे विस्तारत जाते.[३] मनुष्य हा समाजशील प्राणी आहे हे याचेच द्योतक आहे. व्यक्ती आणि समाज यांचे परस्परसंबंध साहित्यव्यवहार अचूक प्रतिबिंबित करत असते म्हणूनच साहित्यास 'समाजाचा आरसा' संबोधल्या जाते. कोणताही



Scanned with CamScanner

समाज असो त्याचा अनुबंध त्या समाजाशी असतो. कारण साहित्याचा मूलाधार शेवटी मनुष्यजीवन आणि समाज हाच असतो. समाजाशी संबंधित असलेल्या प्रत्येकच बाबी साहित्यक्षेत्र अतिशय सखोलतेने टिपत असते. म्हणूनच मानवी हक्काची संकल्पना देखील साहित्य व्यवहारात रुजलेली असल्याचे आपणास दिसून येते. व्यक्ती स्वातंत्र्याची जपणूक, मानवतेची शिकवण, स्वातंत्र्याचा पुरस्कार, अन्याय – विषमतेविरुद्धचा आवाज, समतेची जोपासना आदि सर्व मानवी हक्कांशी संबंधित असणाऱ्या मूल्यांनाना साहित्य व्यक्त करीत असते. व्यक्तीमध्ये असणारा भेद संपुष्टात आणून 'अहं ब्रह्मास्मि ' चा प्रत्यय मानवाधिकाराची सर्वोच्च जाणीव करून देते आणि हीच जाणीव सर्वप्रथम भारतीय संत साहित्यातून व्यक्त होताना दिसते. संत ज्ञानेश्वर माऊलींनी तर पसायदानातून विश्वशांती आणि मानवी हक्काचे समर्थनच केले आहे. हा वारसा पुढे जोपासत मानवी हक्काची संकल्पना साहित्य क्षेत्रातून पदोपदी व्यक्त होताना दिसते. विशेषत्वाने समाजाने वर्षानुवर्षे ज्यांना सर्व हक्क अधिकारापासून वंचित ठेवलेल्या दलित लोकांच्या वेदना रेखाटणाऱ्या दलित साहित्यातून ती प्रकर्षाने प्रतीत होते. दलित साहित्याने 'मानवाची प्रतिष्ठा' हे सर्वश्रेष्ठ मूल्य जोपासले आहे. माणुसकीसाठी लढणे हेच या साहित्याचे मर्म आहे.[४] दलित साहित्याच्या मुळाशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली शिकवण आहे, त्यांनी दिलेली प्रेरणा आहे. दलितांच्या ठायी आत्मसन्मानाची भावना, आत्मविश्वासाची प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केली आणि हीच भावना दलित कवी – कवयित्रींनी कवितेतून अगदी वास्तवतेने व समर्पकतेने अभिव्यक्त केले आहे. दलित कविता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिलढ्याचा जवळचा संबंध आहे. मानवी हक्क, अधिकाराच्या संरक्षणाकरता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन, काळाराम मंदिर प्रवेश यासारख्या विविध मार्गांचा अवलंब केला. त्यांचे हेच मार्गक्रमण कितीतरी कवींच्या लिखाणाला बळ देणारे ठरले आहेत. आपल्या कवित्व शक्तीच्या माध्यमातून कवींनी स्वतःच्या समाज बांधवांना आपल्या हक्क, अधिकाराप्रति जागृत करण्याचे महत्कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रत्येक कृती, प्रत्येक विचार दलितांना आशेची किरणे दाखवीत होता. म्हणूनच वसंत बापटांनी 'भीम विक्रमी वीरा' या रचनेतून आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वाला केलेले वंदन अगदी सार्थच आहे.

चवदार तळ्याचे पाणी
पेटून उठे चैतन्य
तुज पुढती निष्प्रभ झाले
बावदूक पंडित मान्य
जयशाली दलित दलाचा
तू सेनानायक धन्य ..
त्रिवार तुजला अभिवादन
भीम विक्रमी वीरा

(डॉ. भास्कर पाटील – मराठी कवितेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पृ. क्र.३२)

डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येक दलिताला त्याचे जीवन सन्मानाने जगता यावे, त्यांना माणूसपण प्राप्त व्हावे यासाठी आत्मभानाची, आत्मस्थितीची जाणीव करून दिली. न्याय, स्वातंत्र्य, समता, नीतिमत्ता, कायदा आदि तत्त्वाची, हक्काची जाणीव जोपर्यंत दलित वर्गास होणार नाही तोपर्यंत हा वर्ग अन्याय – अत्याचाराला वाचा फोडणार नाही. ही जाणीव डॉ.बाबासाहेबांना झाली होती आणि हेच सामाजिक परिवर्तनाचे साधन होते. हाच विचार दलित कवितेतून निरंतरतेने प्रतीत होताना दिसतो. हीच भावना कवी केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे, वामन कर्डक, दया पवार, त्र्यंबक सपकाळे, प्रल्हाद चेंदवणकर, ज. वि. पवार, यशवंत मनोहर, ज्योती लांजेवार, किसन फागू, महेंद्र भवरे, नारायण सुर्वे, अरुण कांबळ, प्रकाश खरात, अशोक इंगळे, भीमसेन देठे, केतन पिंपळापुरे, विमल वाघमारे अशा कितीतरी कवींच्या लेखणीतून अभिव्यक्त झालेली आहे. या सर्वच कवींनी कवितेला साधन करून मानवी हक्काच्या प्राप्तीची लढाई लढली आहे, जिंकली आहे .शतकानुशतके धर्माच्या नावाखाली माणूसपणाची , मानवतेची सतत विटंबना होत आलेली पाहून पशु–पक्षी–कीटकांना पूजणारा हा हिंदू धर्म अस्पृश्य दलित समाजावर हे वर केवळ कनिष्ठ जातीत जन्माला आल्यामुळे अन्याय अत्याचार करतो. दलितांच्या वाट्याला या शोषणातून आलेली वेदना ही त्यांच्या साहित्यातील विद्रोहाची जननी आहे. म्हणूनच किसन फागू आपल्या कवितेतून दलितांना लाचारी पत्करू नका, धर्माचा मान राखू नका, वेदांना पुसू नका असे आवाहन करतात.

साहू नका कुणाचा जुलूम
होऊ नका कोणाचे गुलाम
सोडून द्यारे सारे बदकाम.

(भालचंद्र फडके – दलित साहित्य वेदना व विद्रोह पृष्ठ क्र.११४)



Scanned with CamScanner

जाती, धर्माच्या नावाखाली होणार्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडत माणूसपणाची वागणूक सर्व सामान्यजनांना मिळावी हाच विचार दलित दलित कवितेच्या मुळाशी असलेला दिसून येतो . एकूणच दलित कवितेतून मानवता प्रेम, विज्ञाननिष्ठा, वेदना विद्रोहाचे दर्शन विशेषत्वाने घडते. म्हणून कवी वामन कर्डक म्हणतात की,

तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफान वारा पाऊसधारा मुळी न आम्हा शिवे

(समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह पृष्ठ क्र.२७५)

विद्रोहाची भावना प्रत्येकच दलित कवी आपल्या कवितेतून व्यक्त करतो कारण विषमता नष्ट झाल्याशिवाय दलित बांधवांमध्ये समतेची, न्यायाची भावना रुजणार नाही याची त्यांना जाणीव होती. कवी नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, दया पवार यांच्या कवितेतून दुःख, वेदना, विद्रोह, नकार, संघर्ष जरी व्यक्त होत असला तरी प्रत्येकाच्या कवितेतील विद्रोही, आवेशी स्वराला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे, तत्त्वज्ञानाचे वैचारिक अधिष्ठान होते. सोबतच गौतम बुद्धांच्या शांती आणि अहिंसेचा मूल्याची त्यास जोड होती. दलित कवींनी नकारा बरोबरच न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवतावादी मूल्यांचा स्वीकार आपल्या कवितेतून केला आहे म्हणूनच कवी नामदेव ढसाळ यांची कविता या सर्व दृष्टीने उल्लेखनीय अशी आहे.

नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे
चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा माणसावरच सूक्त रचावे माणसाचे गाणे गावे माणसाने.

(भालचंद्र फडके – दलित साहित्य वेदना व विद्रोह – पृष्ठ क्र.१४०)

अशा शब्दातून माणूसकीचे मूल्य समाजातील सर्वच माणसांमध्ये रुजावे अशी माफक अपेक्षा कवी नामदेव ढसाळ येथे व्यक्त करतात. दलित वर्गाला अजूनही पशु पातळीवरच जीवन जगावे लागते जातीव्यवस्था, धर्मव्यवस्थेच्या नावाखाली दलितांची होणारी दुरावस्थेतील विरोधाभासाचे चित्र दया पवार अतिशय समर्थपणे चितारतात. आपणच लढण्याचे सामर्थ्य स्वत:मध्ये निर्माण करावे याची प्रेरणा ते समाज बांधवांना देतात. आपल्यावर होणारा अन्याय अत्याचाराविरुद्ध लढण्याचा निर्धार कवी दया पवार व्यक्त करतात.

इंगळ वेचणारा हा फिनिक्स पक्षी
बलिष्ठ आकाशाला भिडणारा आहे
तुला मला जे सुख वैभव देशाने
कधीच वाट्याला येऊ दिले नाही
ते सारं सारं पायी खेचून आणणार आहे .

(भालचंद्र फडके – दलित साहित्य वेदना व विद्रोह पृष्ठ क्र.१४७)

अशा शब्दांतून भारतीय समाजातील सामाजिक – सांस्कृतिक जीवनात असलेली विचित्र दरी समूळतः नष्ट व्हावी तसेच समतेचे मूल्य समाजातील प्रत्येक घटकाने जपावे हा विचार दलित कवीच्या कवितेतून अभिप्रेत होतो. समाजातील दलित बांधवामध्ये असणारा राग, द्वेष, मत्सर, विषमता समूळ दूर होऊन प्रत्येक माणसाला समर्थ असणारे सृजनात्मा नारायण सुर्वे मानतात. एका नव्या युगाची, नव्या क्षितिजाची ही वाटचाल आहे हे त्यांच्या कवितेतून व्यक्त होताना दिसते. 'क्षितिज रुंद होत आहे ' या कवितेतून नारायण सुर्वे सांगतात,

आज तडकलेले मन
एकसंध होत आहे
आणि उसवलेले धागे
गुंफोनीया देत आहे
आज माझ्या कोरड्या या
शब्दात आग येत आहे
आणि नव्या सृजनाचे
क्षितिज रुंद होत आहे.

(भालचंद्र फडके- दलित साहित्य वेदना व विद्रोह पृष्ठ क्र.१३५)

दलित बांधवांमध्ये नवयुगाच्या निर्मितीचे स्वप्न रुजू लागले आहे आणि हे स्वप्न पूर्णत्वास नेण्याचे कार्य या दलित कवींना करावे लागणार आहे. ही जाणीव कवींमध्ये निर्माण झाली होती . म्हणूनच न्याय, स्वातंत्र्य, समता, माणूसकी ही मूल्ये समाजामध्ये रुजण्याकरिता शब्दांची असणारी ताकद कवीने ओळखली होती. नव्याने जाग्या झालेल्या समाजबांधवांना शब्द जिव्हाळ्याचे होते. वामन निंबाळकर यांनी शब्दांमध्ये असणारे वैचारिक परिवर्तनाचे सामर्थ्य ओळखले होते म्हणूनच वामन निंबाळकर म्हणतात



Scanned with CamScanner

शब्दांनीच पेटतात घरे, दारे देश
आणि माणसे सुद्धा
शब्द विझवतात आगही
शब्दांनी पेटलेल्या माणसांची

(भालचंद्र फडके – दलित साहित्य वेदना व विद्रोह पृष्ठ क्र.१५३)

शब्दांतून अन्यायाला, अत्याचाराला, विषमतेला वाचा फोडण्याचे सामर्थ्य कवीने ओळखले होते. त्र्यंबक सपकाळे यांची कविता देखील आपल्या दलित बांधवांना लढण्याकरिता एकत्र येण्याचे आवाहन करते. या पुकारलेल्या लढ्यातून माणूस म्हणून मानसन्मानाने जगण्याचे स्वप्न साकार होईल असा आशावाद त्यांची कविता बाळगते. नरेशकुमार इंगळे यांची कविता देखील प्रतिगामी शक्तींशी संघर्ष करून क्रांतीचा आरंभ झाल्याची ग्वाही देताना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिकवणूकीतूनच समता, न्याय, बंधुता, मानवता समाजामध्ये निर्माण होणार आहे. असा विश्वास सर्वच दलित कवितांमध्ये रुजला आहे. बऱ्याच बाबींना नकार देणारी दलित कविता मूल्याधिष्ठित जीवन संदर्भाचा स्वीकार देखील करताना दिसते. म्हणून यशवंत मनोहर म्हणतात की

शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती
गातो ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्या हातात उजेड देतो

(डॉ. यशवंत मनोहर – उत्थानगुंफा – पृष्ठ क्र.१६८)

दलित कवितेत माणसांच्या हाती उजेड देण्याची जी परंपरा आहे त्याचा स्वीकार सर्वच दलित कवी प्रामुख्याने करताना दिसतात. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळवून देणारी भावना यशवंत मनोहर वरील ओळीतून अगदी सूचकतेने व्यक्त करताना दिसतात. प्रल्हाद चेंदवणकर आपल्या कवितांमधून समस्त समाज बांधवांना बंडाचा झेंडा उभारण्याकरिता सिद्ध झालो आहोत ही जाणीव करून देतात. मानवी हक्काची मुल्ये आता समाजातील सर्वच घटकांमध्ये रुजू लागली होती आणि त्याची निश्चिती देखील कवी प्रल्हाद चेंदवणकर कवितेतून अगदी विश्वासाने करताना दिसतात.

मी चाललो आहे आता
त्या एका निश्चित दिशेने
जिथे मला माझे सर्वस्व हरवलेले
परत मिळणार आहे .

(भालचंद्र फडके – दलित साहित्य वेदना व विद्रोह पृष्ठ क्र.१६०)

असा आशावाद प्रल्हाद चेंदवणकरांची कविता व्यक्त करते. बौद्ध म्हणजे कोणतीही एक विशिष्ट जात अथवा विशिष्ट धर्म नव्हे तर तो एक नवा संस्कार आहे, नवीन जीवनमूल्य नवजीवन मार्ग आहे.[५] याच जीवन मूल्यांचा संदर्भ दलित कवितेत अभिप्रेत आहे. भोवतालचे पारंपरिक जोखड तोडत मराठी काव्यप्रांतात दलित कवितेने आपले वेगळेपण जोपासले आहे. राजा ढाले, चोखा कांबळे, अरुण कांबळे, धनराज डहाट, मोरेश्वर वहाने, बबन चहांदे, नीलकांत चव्हाण, हरीश बनसोडे, चंद्रकांत वानखडे, धर्मराज निमसरकर, माधव कोंडविलकर अशा कितीतरी दलित कवींनी मराठी कविता आपल्या अनुभव विश्वाने, आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाने स्वतःच्या लेखणीतून समृद्ध केलेली आहे.

एकंदरीत वरील सर्व विवेचनावरून असे लक्षात येते की दलित कविता 'मानवता' हे विचारसूत्र जपण्याची भूमिका निरंतर पार पडताना दिसते. शोषितांचे, पिडितांचे आयुष्य प्रकाशमान करण्याची ग्वाहीही दलित कविता देताना दिसते. मानवी हक्काची मुल्ये सर्व समाज बांधवामध्ये रुजावी हा विचार प्रकर्षाने व्यक्त करते .शूद्रातिशूद्रांना शोषण मुक्त करून संपूर्ण विश्वच शांततामय, शोषणमुक्त, नीतिमान करण्याच्या भूमिकेपर्यंत दलित कविता विस्तारित जाताना दिसते. मानवतेच्या अंगाने जीवन जगण्याचे सत्त्व, नैतिकतेचे आचरण, नैतिकतेच्या अंगाने स्पर्श झालेले ज्ञान आणि नैतिकतेतूनच व्यक्त झालेली करुणा हेच मानवतेचे खरे खरे रूप होय. हे रूप दलित कविता सशक्तपणे कवितेच्या माध्यमातून व्यक्त करताना दिसते.

आता निश्चित मनाने
कंठ करावा मोकळा
केला आहे साऱ्यांसाठी
सावलीचा द्राक्ष मळा.

(केशव मेश्राम – जुगलबंदी पृष्ठ क्र.६८)

हे कवींचे शब्द मानवतेचे, नैतिकतेचे दर्शन घडविताना दिसतात. मनुष्याला जीवन सन्मानाने जगण्याची मिळालेली शाश्वती यातून व्यक्त होते. 'जगा आणि जगू द्या' या तत्त्वाचा अवलंब करीत दलित कविता सर्वसामान्यांना संविधानाने सर्वसामान्यांना बहाल केलेल्या समता, स्वातंत्र्य न्याय, बंधुता या सूत्रांचा आविष्कार करताना दिसून येते.



Scanned with CamScanner

**निष्कर्ष :**

* मानवी हक्क शाश्वत मानवी जीवनासाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असल्याने त्याचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे .
* मानवाच्या सुखाशी समाधानाची मानवी हक्काचा अतिशय निकटचा संबंध असलेला दिसून येतो
* दलित साहित्यातून मानवी मूल्यांचे जीवन संदर्भ विशेषत्वाने प्रतीत होतात.
* दलित कविता स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांचा अविष्कार करणारी आहे.
* बदलत्या जीवन मूल्यांचा स्वीकार आपल्या जाणिवेतून, अभिव्यक्तीतून दलित कविता करताना दिसते.
* अस्पृश्यतेचा शेवट आणि माणूसकीची सुरुवात हे दलित कवितेचे स्वप्न सर्वच दलित कवींच्या कवितेतून साकार झालेले आहे.

**संदर्भसूची :**


१) डॉ. विलास सोनवणे, प्रा.सुरेश भालेराव (२०१५). मानवी हक्क सिद्धांत आणि व्यवहार, प्रशांत पब्लिकेशन जळगाव प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. ९

२) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूर शिक्षण केंद्र (२०१५). 'समाज आणि मानवी हक्क', प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.३.

३) डॉ.शरद गोसावी (२००९). व्यक्तिस्वातंत्र्याची बदलती संकल्पना, डायमंड पब्लिकेशन्स पुणे प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.७

४) मृणालिनी पाटील, ज्योती लांजेवार, मदन धनकर (संपा). समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह, विजय प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.२७१.

५) भालचंद्र फडके (१९८९). दलित साहित्य : वेदना व विद्रोह. श्री विद्या प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती, पृष्ठ क्र.१६१.


●●●



Scanned with CamScanner